| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.९५६/२०११ |
| सरकार -वि- नितेश |
| निशाणी क्र. १४ |

**फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ नुसार पुरावा**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची शपथेवर सरतपासणी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | दिनेश महादेवप्रसाद पांडे |
| **वय** | : | ५६ वर्षे, |
| **धंदा** | : | व्यवसाय, |
| **राहणार** | : | न्यु बाबुळखेडा, नागपूर |

**सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती अमृता सोले यांचेमार्फत**

दिनांक ०६.०३.२०११ रोजी पोलीस माझ्या दुकानाजवळ आली होती. त्यादिवशी माझ्या दुकानासमोरुन एका महिलेचे मंगळसुत्र एका ईसमाने हिसकावले. तेव्हाच त्या ईसमाला लोकांनी पकडले. पोलीस आल्यावर पोलीसांनी त्या ईसमाला पोलीस स्टेशनला नेले. सदर घटनेबाबत पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. त्यातील मजकूर मला वाचून दाखविला व त्यावर मी सही केली. सदरचे घटनास्थळ मीच पोलीसांना दाखविले होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दिनांक ०६.०३.२०११ दाखविण्यात आला. पोलीसांनी माझ्यासमक्ष केलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी पी-१** देण्यात आला. ज्या ईसमाने मंगळसुत्र हिसकावले होते, मी त्याला बघीतले होते. मी त्यास बघीतल्यास ओळखू शकतो. आज तो कोर्टासमक्ष हजर नाही.

**सरतपास पुर्ण**

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE

Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2026.03.12 16:07:18 +0530

**( अनामिका दे. बोस )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक १२.०३.२०२५